ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3484. Licence No. 53.

वर्ष २४ | पुणें, बुधवार तारीख १० सप्टेंबर, १९५८ | अंक १७

## विविध माहिती

**इटलीकडून आलेली मागणी**—भारताकडून लोखंडाची माती दीर्घ करारानें घेण्याची तयारी इटलीकडून दाखविण्यांत आली आहे. मध्यवर्ती सरकार, नियोजन-समितीचा सल्ला घेऊन ह्यासंबंधीं निर्णय घेणार आहे. करार करण्याचें ठरल्यास पश्चिम किनाऱ्यावर असणाऱ्या बंदरांतून खनिजाची निर्यात करण्यांत येईल.

**संयुक्त-राष्ट्रसंघाला पुस्तकाची भेट**—रशिआनें संयुक्त-राष्ट्रसंघटनेला कांहीं पुस्तकें भेट म्हणून दिलीं आहेत. सर्व पुस्तकें अद्यावत् असून हैड्रोजन बाँबच्या स्फोटांत उत्पन्न होणारी प्रचंड शक्ति ताब्यांत कशी ठेवावी ह्यासंबंधीं रशिअन शास्त्रज्ञांनीं केलेल्या संशोधनाचीं आहेत. अणुविज्ञानाच्या शांततामय उपयोगासंबंधीं जिनिव्हांत चालू असलेल्या प्रदर्शनाच्या निमित्तानें ही भेट देण्यांत आली आहे.

**अणुशास्त्रज्ञाची शास्त्रज्ञ कन्या**—फ्रान्सचे दिवंगत अणुशास्त्रज्ञ प्रा. जोलिओ क्युरी ह्यांच्या कन्येला भारतांत नौकरी देण्यांत यावी अशी सूचना भारतांत स्थायिक झालेले ब्रिटिश शास्त्रज्ञ प्रा. हाल्डेन ह्यांनीं केली आहे. कु. झोलिओ क्युरी आपल्या आई-वडिलांच्या पेक्षाहि वरच्या दर्जाच्या शास्त्रज्ञ आहेत असा त्यांचा लौकिक आहे.

**साखरेच्या निर्यातीमुळें नफा**—इंडिअन शुगर मिल्स असोसिएशननें १९५७-५८ सालीं साखरेची परदेशी निर्यात करून १२ लाख रुपये नफा मिळविला. पण निर्यातीच्या ५०० टनांच्या नुकत्याच पाठविलेल्या हप्त्यांत मात्र ६५,००० रुपये तोटा झाला. भारतामधील साखर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंतील चालू भावानें विकावी लागली, म्हणून हा तोटा झाला.

**सिनेमाची यंत्रसामुग्री**—जपानमध्यें तयार करण्यांत आलेली सिनेमाची यंत्रसामुग्री भारतांत निर्यात करण्याची शक्यता अजमावण्यासाठी जपानी व्यापाऱ्यांचें एक प्रतिनिधी-मंडळ भारताच्या दौऱ्यावर आलें होतें. ह्या सामुग्रीच्या मुंबईंतील आयात व्यापाऱ्यांशीं त्यांनीं ह्या बाबतींत चर्चा केली. अशी आयात करण्याचा हा पहिलाच प्रयत्न आहे.

**कायद्यांचीं हिंदी भाषांतरें**—मध्यवर्ती सरकारच्या कायदे खात्यानें २१२ मूळ इंग्रजी कायद्यांचीं आणि ४५ दुरुस्तीच्या कायद्यांचीं हिंदी भाषेंत भाषांतरें केलीं आहेत. कायद्याच्या इंग्रजी परिभाषेंतील शब्दांपैकीं ३,९१० शब्दांना हिंदींतील पर्याय शब्द निश्चित करण्यांत आले आहेत, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली.

**अन्नपदार्थांचें प्रदर्शन**—लंडन येथें अन्नपदार्थांचें एक मोठें प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. ह्या प्रदर्शनांत निरनिराळ्या १२ देशांतील स्त्रियांनीं आपआपल्या देशांतील अन्नपदार्थ बनवून मांडले होते. प्रदर्शनांत भारताच्या स्त्रियांनींहि भाग घेतला होता. भारतीय अन्नपदार्थांत साधेपणावर भर देण्यांत आला होता.

**पगारांतील कपात रद्द केली**—देशांतील तंगीची आर्थिक परिस्थिति लक्षांत घेऊन लोकसभेच्या १६ सभासदांनीं गेल्या वर्षी अधिक प्रमाणांत आपल्या पगारांत स्वेच्छेनें कपात करून घेतली होती. त्यांपैकीं ७ सभासदांनीं आपल्या पगारांतील कपात रद्द केली आहे. गेल्या वर्षी ह्या पगारकपातीमुळें सरकारचे १४,००० रुपये वांचले होते.

**आसामची मागणी फेटाळली**—आसामच्या सरकारनें गौहाटी व चेरापुंजी ह्या ठिकाणीं हौशी प्रवाशांना उतरण्यासाठी विश्रामस्थान बांधण्याचें ठरवून नियोजन-समितीकडे मदत मागितली होती. परंतु नियोजन-समितीनें ह्या कामावर खर्च करण्याच्या एकूण रकमेंतच काटाकाट केल्यामुळें आसामची मागणी फेटाळली आहे.

**मँगेनीझच्या बदली गहूं**—अमेरिकेकडून गहूं घेऊन त्याच्या बदली मँगेनीझ ह्या खनिजाची माती पुरविण्याचा एक करार करण्याचा भारत सरकारचा विचार आहे. १९५७ सालीं भारतानें १३·७४ लाख टन मँगेनीझचें उत्पादन केलें. सर्वांत अधिक, म्हणजे ३·८२ लाख टन उत्पादन ओरिसा राज्यांत झालें. ओरिसाच्या खालोखाल मुंबई राज्यांत ३·५९ लाख टन उत्पादन झालें.

**दानतीच्या अभावाचें अरिष्ट**—भारताचे संरक्षणमंत्री श्री. कृष्ण मेनन विद्यार्थ्यांच्या मेळाव्यांत बोलतांना म्हणाले कीं, सध्यां लोकांत दानतीच्या अभावाचें अरिष्ट पसरलें आहे. हें अरिष्ट परदेशीय चलनाच्या टंचाईचें अगर आयातीवरील निर्बंधाचें नसून आत्मविश्वासाच्या व दानतीच्या अभावाचें आहे. लोकांत अजून राष्ट्रीय वृत्ति निर्माण झालेली नाहीं.

**सोन्याची चोरटी आयात**—भारतांत चोरट्या मार्गानें बेकायदा आयात करण्यांत येणाऱ्या सोन्याचा नक्की अंदाज करणें कठीण आहे. तरीपण, सोन्याच्या चोरट्या आयातीमुळें भारताचें परदेशीय चलनाचें नुकसान खूप मोठें होतें. एका अंदाजाप्रमाणें, भारतामध्यें आयात होणाऱ्या चोरट्या सोन्यामुळें दरसाल ३० ते ४० कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाला भारताला मुकावें लागतें.

**खतांच्या वितरणाचा मक्ता**—आंध्र सरकारच्या सहकारी मंत्र्यांनीं असें जाहीर केलें आहे कीं, खतांच्या वितरणाचा मक्ता राज्यांतील सहकारी संस्थांना देण्यांत आला आहे. खताच्या वहातुकीसाठी दोन अधिकारी नेमण्यांत आले असून सहकारी संस्थांत भांडवल गुंतविण्यासाठी सरकारनें २८ लाख रुपयांची तरतूद केल्याचेंहि त्यांनीं सांगितलें.

**१७,००० रुपयांची नुकसानभरपाई**—ठाण्यांतील एका मुलाला मोटारट्रकचा धक्का लागून अपघात झाला होता. अपघातामुळें मुलाचा पाय तोडावा लागला होता. मुलाच्या वडिलांनीं कोर्टांत नुकसानभरपाईचा दावा लावला होता. कोर्टानें ड्रायव्हरच्या चुकीमुळें अपघात झाला असा निकाल देऊन ट्रकच्या मालकांकडून १७,३८७ रुपये नुकसानभरपाई देवविली.

**करतज्ज्ञाचा मेहनताना**—भारतामधील करपद्धतीची चौकशी करून अहवाल करण्याच्या कामाबद्दल ब्रिटिश प्राध्यापक मि. काल्डोर ह्यांना पगार देण्यांत आला नाहीं, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. मात्र भारतीय आंकडेशास्त्रीय संस्थेनें त्यांचा येथें रहाण्याचा व प्रवासाचा खर्च दिला. संस्थेनेंच त्यांना बोलावलें होतें. त्यांचा अहवाल छापण्यास ६,४०० रुपये लागले.

**मोफत व सक्तीचें प्राथमिक शिक्षण**—मध्यवर्ती सरकारचे शिक्षणमंत्री डॉ. श्रीमाळी ह्यांनीं लोकसभेंत एका प्रश्नाला उत्तर देतांना असें सांगितलें कीं, तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस देशांतील ६ ते ११ वर्षेपर्यंतच्या मुलांना सक्तीचें मोफत प्राथमिक शिक्षण देण्याची व्यवस्था होईल. भारत सरकारच्या अमलाखालीं असलेल्या भागांतहि अशी व्यवस्था होईल.

**पूरपीडितांना मदत**—औरंगाबाद-पैठण भागांत झालेल्या अतिवृष्टीमुळें सुमारें ३,००० घरें पडलीं आहेत. त्यांपैकीं १,५०० घरें तर औरंगाबाद शहरांतच कोसळलीं आहेत. पूरपीडितांना मदत करण्यासाठीं मुंबई सरकारनें औरंगाबादच्या कलेक्टरकडे २५,००० रुपये पाठविले आहेत. पूरग्रस्त भागाची प्रथम पाहणी करण्यांत येणार आहे.

**गुजरातच्या इतिहासावर प्रकाश**—वल्लभ विद्यानगर विद्यापीठाचे पुराणवस्तुशास्त्रज्ञ श्री. अमृत पंड्या ह्यांना ३० राजाज्ञा, कांहीं शिलालेख व ताम्रपट ह्यांचा शोध लागला आहे. ह्या भूतकालीन साहित्यामुळें ४ थ्या शतकापासून १६ व्या शतकापर्यंतच्या गुजरातच्या इतिहासावर नवा प्रकाश पडण्याचा संभव आहे. शिलालेख गुजरातींत असून त्यांच्यामुळें गुजराती भाषेच्या विकासावरहि अधिक प्रकाश पडेल.

**हौरा-बरद्वान रेल्वेरस्ता**—पूर्व रेल्वेवरील हौरा-बरद्वान ह्या ६६ मैल लांबीच्या मार्गावर आतांपर्यंत वाफेचीं एंजिनें वापरण्यांत येत होतीं. आतां विजेचीं एंजिनें चालू करण्यांत आलीं आहेत. पूर्व रेल्वेवर विजेच्या साह्यानें वहातूक सुरू करण्याच्या योजनेचाच हा भाग आहे. संपूर्ण योजनेला १४ कोटींवर रुपये खर्च करावे लागणार आहेत.


# * सारस्वत कोऑपरेटिव्ह बँक लि. *

स्थापना १९१८ ] सारस्वत बँक-गृह, मुंबई ४. [ टेलिफोन २७०९४

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | :: | :: | रु. १०,००,००० |
| वसूल भांडवल | :: | :: | रु. ७,९७,८४० |
| रिझर्व्ह फंड | :: | :: | रु. ८,३४,७०० |
| ठेवी | :: | :: | रु. १,७९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | :: | :: | रु. १,९९,६९,००० |

बँकेच्या शाखा : फोर्ट, दादर, वरळी, माहिम, पुणें, बेळगांव.

महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, गिरगांव, मुंबई ४.

# * दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड *

( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :—१० बुधवार पेठ, पुणें २
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन ६५६३ )

अध्यक्ष
श्री. ग. रा. साठे

मुंबई शाखा :—८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १
कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन २५३४०८ )

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल ... ... रु. ७,३०,४९०
खेळतें भांडवल ... ... रु. ५८,००,०००

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १½% टक्के ★ मुदत ठेवींवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल्. बी. मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. १० सप्टेंबर, १९५८






संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## हिंदी चित्रपटांची परदेशांतील लोकप्रियता

भारत-सरकारच्या निर्यात वाढ सल्लागार समितीची बैठक दिल्ली येथें भरली होती. ह्या बैठकींत परदेशीय व्यापाराचे डायरेक्टर जनरल श्री. के. बी. लाल ह्यांनीं असें जाहीर केलें कीं, भारत सरकारनें चित्रपटांना लागणारी आणखी कांहीं कच्ची फिल्म आयात करण्याचें ठरविलें आहे. परदेशी चलनाची चणचण असल्यानें अशा फिल्मची आयात कठीण झाली असली तरी भारतीय चित्रपट परदेशांत दाखविण्यासाठी निर्यात करण्यांत येतात व त्यामुळें परदेशी चलनाची प्राप्ति होते. निर्यात करणाऱ्या उद्योगधंद्यांच्या परदेशी प्राप्तींतून कांहीं भाग त्यांना लागणाऱ्या आयातीसाठी राखून ठेवण्याच्या सरकारी धोरणानुसारच कच्ची फिल्म आयात करण्याचा निर्णय घेण्यांत आला आहे. सिनेमाशिवाय इतर धंद्यांना लागणारा कच्चा माल आयात करण्यास सवलती देण्याच्या सरकारच्या धोरणाशीं वरील निर्णय सुसंगत आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सिनेमाचा धंदा हा जीवनावश्यक धंद्यांपैकी नसला तरी कच्च्या फिल्मच्या तुटवड्यामुळें धंद्याला अवकळा येऊन बेकारी पसरणें केव्हांहि इष्ट ठरणार नाहीं. त्याहि दृष्टीनें ह्या निर्णयाचें स्वागत करणेंच उचित ठरेल.

शिवाय ह्या प्रश्नाला दुसरीहि एक बाजू आहे. ठिकठिकाणीं भरविण्यांत येणाऱ्या आंतरराष्ट्रीय चित्रपट प्रदर्शनांत गेल्या कांहीं वर्षांत भारतीय चित्रपटांना बक्षिसें मिळालीं आहेत. ह्या प्रदर्शनांच्या निमित्तानें हिंदी चित्रपट परदेशांत दाखविले गेले आणि ते लोकप्रियहि झाले. सुप्रसिद्ध दिग्दर्शक श्री. शांताराम ह्यांच्या एका चित्रपटाला नुकताच बक्षिसाचा सन्मान लाभला आहे. ह्यावरून हिंदी चित्रपट परदेशांत लोकप्रिय होऊं लागल्याचें स्पष्ट होतें चित्रपटांच्या लोकप्रियतेमुळें त्यांच्या परदेशांतील बाजारपेठांचाहि विस्तार होऊं लागला आहे. परदेशी चलन मिळविण्याचा हा एक नवाच मार्ग भारताला उपलब्ध झाला आहे. म्हणून केवळ सांस्कृतिक नव्हे तर आर्थिक दृष्ट्याहि चित्रपटाच्या निर्यातीला महत्त्व आलें आहे. गेल्या कांहीं वर्षापर्यंत हिंदी चित्रपट भारताच्या आसपासच्या देशांनाच निर्यात केले जात. ज्या शेजारी देशांतून हिंदी लोकांची वस्ती मोठ्या प्रमाणावर असे, त्याच देशांना चित्रपट निर्यात करण्यांत येत असत. ह्या पहिल्या बाजारपेठांतून हिंदी चित्रपटांची मागणी पूर्वीप्रमाणें येत आहेच; पण, त्याशिवाय हिंदी बोलपट आशिआंतील निरनिराळ्या देशांतून आणि कांहीं युरोपीय देशांतूनहि लोकप्रिय होत आहेत. भारत सरकारच्या व्यापार व उद्योगखात्याचे व्यापारी प्रतिनिधी अनेक देशांत आहेत. त्यांच्याकडून खात्याकडे आलेल्या माहितीवरून असें दिसतें कीं, ब्रिटन व पश्चिम जर्मनीसारख्या देशांतल्या लोकांना हिंदी चित्रपट आवडतात. म्हणून त्यांनीं अशी सूचना केली आहे कीं, हिंदी चित्रपटांना परदेशी भाषांतील संवाद जोडण्यांत यावेत. उदाहरणार्थ, इंग्रजी व जर्मन भाषेंतील संवाद जोडण्यांत आल्यास हिंदी चित्रपटांची बाजारपेठ अधिक विस्तार पावूं शकेल.

सध्यां भारताच्या परदेशी गिऱ्हाइकांत सिलोनचा अनुक्रम पहिला लागतो. सीलोनच्या खालोखाल हिंदी चित्रपटांच्या आयातींत सिंगापूरचा नंबर लागतो. १९५८ च्या पहिल्या चार महिन्यांत सीलोननें ९ लाख रुपये किंमतीचे हिंदी चित्रपट आयात केले. ह्याच कालावधींत सिंगापूरनें ६ लाख रुपये किंमतीचे बोलपट आयात केले. तिसरा नंबर फिजी बेटांचा लागतो. फिजीमध्यें ३ लाख रुपयांचे बोलपट आयात करण्यांत आले. फिजी येथील भारतीय व्यापारी प्रतिनिधीनें आणखी बोलपट आयात करण्यास जागा आहे असें कळविलें आहे. त्याशिवाय इंडोनेशिआ, इराण, लेबॅनॉन व पाकिस्तान हे देशहि हिंदी चित्रपट आयात करतात.

---

## ब्रिटनमधील वर्णद्वेषाचें आर्थिक कारण

ब्रिटनमध्यें लंडन शहरांत व इतरत्र वर्णद्वेषाच्या वृत्तीनें आपलें डोकें वर काढलें आहे. ब्रिटनसारख्या जुन्या लोकशाही देशांत वर्णद्वेषाची आग भडकावी हें कांहींसें चमत्कारिक वाटतें. अमेरिकेंतील वर्णद्वेषाला कांहीं ऐतिहासिक कारणें आहेत. दक्षिण आफ्रिकेंत सरकारनेंच वर्णद्वेष फुलविला आहे. खुद्द ब्रिटनमध्येंहि वर्णद्वेष औषधापुरता सुद्धां नव्हता असें नाहीं. पण त्याचें स्वरूप गौरेतर व्यक्तींच्या तुरळक अपमानापलीकडे फारसें कधीं गेलें नाहीं. लंडनच्या पश्चिम भागांत नुकत्याच झालेल्या दंगलींत मात्र हजारों गौरकायांनीं भाग घेतलेला आहे. ह्याची सामाजिक पार्श्वभूमि आर्थिक कारणांतून उत्पन्न झालेली आहे. गेल्या कांहीं वर्षांत ब्रिटनमध्यें वेस्ट इंडीज व इतर वसाहती ह्यांमधून बरेच काळे अदमी कामधंद्यानिमित्त आले आहेत. ब्रिटनमध्यें नौकऱ्यांचा सुकाळ होता आणि कामगारांचा दुष्काळ होता तोंपर्यंत ह्या नवागतांकडे कोणी फारसें लक्ष दिलें नाहीं. परंतु गेल्या कांहीं महिन्यांत ब्रिटनमधील आर्थिक परिस्थिति ओढगस्तीची झाली. कारखाने बंद पडूं लागले आणि नौकऱ्या मिळणें दुरापास्त होऊं लागलें. त्याबरोबर गोऱ्या नौकरीवाल्यांना काळ्या नौकरीवाल्यांची स्पर्धा होऊं लागली. ब्रिटनमध्यें आलेले निग्रो लोक बहुतेक मोलमजुरी करणारे अकुशल कामगार आहेत. त्यांनीं शहरांतील दाट लोकवस्तीच्या भागांत राहण्याची जागा मिळविली व ते स्थायिक झाले. शहरांतील राहण्याच्या जागांच्या टंचाईमुळें मग कुरबुरी सुरू झाल्या व नौकरी मिळविण्याच्या स्पर्धेत ह्या कारणाची भर पडली. शिवाय गौरकाय स्त्रियांशीं निग्रो लोकांचें साहचर्यहि खुपूं लागलें. वर्णद्वेषाची झळ, फक्त निग्रो लोकांनाच लागत आहे असें नाहीं. लंडनमध्यें एंजिनिअरिंगचा अभ्यास करणाऱ्या एका हिंदी विद्यार्थ्यालाहि शाळकरी मुलांनीं प्रसाद दिला आहे.

---

## नद्यांच्या पुरांच्या नियंत्रणाचा प्रश्न

भारतामधील अनेक नद्यांना पावसाळ्यांत पूर येतात व त्यामुळें वित्ताची व प्राणांची बरीच हानि होते. पुरांना नियंत्रणें घालण्याच्या योजना हातीं घेण्यांत आल्या असल्या व त्यांपैकी कांहीं अंशतः पुऱ्या झालेल्या असल्या तरी हा धोका अद्याप नष्ट झालेला नाहीं. चीनमधील नद्यांनाहि असेच पूर येतात. तेव्हां पुरांचें नियंत्रण करण्यासाठी तेथें काय उपाय करण्यांत येतात त्याची पाहणी करण्यासाठी भारताच्या एंजिनिअरांचें एक पथक कांहीं वर्षांपूर्वी चीनला पाठविण्यांत आलें होतें. ह्या पथकानें केलेल्या कोणत्या व किती शिफारशी अमलांत आणल्या गेल्या तें समजलेलें नाहीं. दरम्यान, चीनमधील सुप्रसिद्ध पीत नदीच्या बदलणाऱ्या पात्राला वेसण घालण्यांत तेथील एंजिनिअरांनीं यश मिळविल्याचें समजतें. पीत नदीच्या कांठीं बांधण्यांत आलेले बंधारे दोन मीटर्सनीं अधिक उंच करण्यांत आले आहेत. ज्या ठिकाणीं मातीचे बंधारे होते त्यांच्या तोंडाच्या भागाला दगडांचें काम करण्यांत आलें आहे. बांधबंधाऱ्यांना अधिक मजबुती देण्यासाठी त्यांच्यावर गवत व झाडेंझुडपें लावण्यांत आलीं आहेत. बंधाऱ्यांमधील गळतीचीं ठिकाणें शोधून त्यांचा वेळेवर बंदोबस्त करण्यांत आला आहे. ह्या सर्व उपायांचा परिणाम होऊन पीत नदी आपलें पात्र बदलण्याचा धोका आतां राहिलेला नाहीं. ही नदी आपलें पात्र बदलण्याच्या बाबतींत ख्यातनाम झालेली होती. इतिहासाच्या ज्ञातकालांतच २६ वेळां तिनें आपल्या प्रवाहाची दिशा बदलल्याची नोंद आहे. भारतामधील नद्या चीनमधील नद्यांच्या मानानें बऱ्याच अदबीनें वागणाऱ्या आहेत. त्यामुळें त्यांच्यावर नियंत्रण ठेवतां येणें अधिक सोपें आहे, असें तज्ज्ञांचें मत आहे.

---

## आयुर्विमा कॉर्पोरेशनची भक्कम आर्थिक स्थिति

आयुर्विमा कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. गोपालकृष्णन् ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, कॉर्पोरेशनची आर्थिक परिस्थिति भक्कम आहे. ह्या संबंधींचा तपशील सांगताना ते म्हणाले कीं, कॉर्पोरेशनची स्थापना झाल्यावर पहिल्या वर्षी विम्याच्या हप्त्याचें उत्पन्न दरमहा ४·६ कोटी रुपये होतें. दुसऱ्या वर्षाच्या पहिल्या अकरा महिन्यांत हें उत्पन्न ५·४ कोटी रुपये झालें. विम्याच्या पोटीं देण्यांत येणाऱ्या रकमांची दरमहाची सरासरी पहिल्या वर्षांत १·२ कोटी रुपये होती. ह्या सरासरी रकमेंतही वाढ झाली असून दुसऱ्या वर्षांत ती १·४ कोटी रुपये झाली. पहिल्या वर्षी शिल्लक निधि म्हणून ३०·२ कोटी इतकी रक्कम गुंतविण्यासाठीं उपलब्ध होती. दुसऱ्या वर्षांच्या पहिल्या अकरा महिन्यांत ती ३४.७ कोटी रुपये झाली. कॉर्पोरेशननें गुंतविलेली एकूण रक्कम सध्यां ३८३·३ कोटी रुपये आहे. त्यापैकीं २७५·८ कोटी रुपये सरकारी व सरकारमान्य रोख्यांत गुंतविण्यांत आले आहेत. स्टॉक्स, शेअर्स व डिबेंचर्स ह्या प्रकाराच्या गुंतवणुकींत ७२·८ कोटी रुपये आहेत. गहाणाच्या व इतर कर्जाच्या व्यवहारांत १४ कोटी रुपये गुंतविण्यांत आले आहेत, आणि २०·९ कोटी रुपये स्थावर मालमत्तेंत गुंतविण्यांत आले आहेत. १९५७ मध्यें कॉर्पोरेशननें २८३ कोटींचा नवा धंदा करून उच्चांक गांठला. चालू सालीं आतांपर्यंतचा नवा धंदा मागील वर्षाच्या मानानें अधिक आहे. नवा धंदा मिळण्याचा हाच वेग चालू राहिल्यास १९५८ साल मागील सालापेक्षाहि चांगलें जाईल. कॉर्पोरेशनच्या पैसा गुंतविण्याच्या कामीं जी चौकशी करण्यांत आली तीमुळें कॉर्पोरेशनच्या नव्या धंद्यावर तात्पुरता वाईट परिणाम झाला; पण पुढें परिस्थिति सुधारली.

## नेपा गिरणीच्या भांडवलाची पुनर्घटना

मध्यप्रदेशांतील नेपा ह्या कागदाच्या गिरणीच्या भांडवलाची पुनर्घटना करण्याचा विचार मध्यवर्ती सरकारतर्फे चालू आहे. ह्या गिरणीला सरकारनें वेळोवेळीं कर्जाऊ रकमा दिलेल्या आहेत. आतां कर्जाचें रूपांतर भाग–भांडवलांत करण्यासंबंधीं विचार करण्यांत येत आहे. गिरणीला ३१ मार्च, १९५८ अखेर सरकारतर्फे देण्यांत आलेल्या कर्जाचा एकूण आंकडा २,८२,७३,००० रुपये आहे. कारखाना अधिक चांगल्या रीतीनें चालवितां यावा म्हणून कर्जाचें रूपांतर भांडवलांत करणें इष्ट समजलें जात आहे. रूपांतराची ही योजना अमलांत आली म्हणजे एकूण भाग–भांडवलांत मध्यवर्ती सरकारचा ५१ टक्के हिस्सा राहील, मध्यप्रदेश सरकारच्या मालकीचें ३५ टक्के भांडवल असेल आणि बाकीच्या भागीदारांचें १४ टक्के भांडवल असेल. गिरणीच्या ताज्या ताळेबंदाप्रमाणें एकूण वसूल भांडवलाचा आंकडा १,३३,५२,००० इतका आहे. त्यांपैकीं ६,०६,००० रुपयांचें भांडवल रद्द झालेलें आहे. सध्यां गिरणींत वृत्तपत्राला लागणाऱ्या कागदाचें दररोज सुमारें ६० ते ६५ टन उत्पादन करण्यांत येतें. तें वाढवून रोज १०० टनांपर्यंत नेण्यासंबंधींची एक योजना मध्यप्रदेशाच्या सरकारनें नियोजन-समितीला सादर केली आहे. उत्पादन वाढविण्याची योजना अमलांत आणली गेल्यावर दरसाल सुमारें १॥ कोटी रुपयांच्या परदेशी चलनाची बचत होईल, असें सांगण्यांत येत आहे. देशांत वृत्तपत्रीय कागदाचा खप सालीना सुमारें ७५,००० ते ८५,००० टनांपर्यंत आहे. पण नेपा गिरणींत दरसाल ३०,००० टनच कागद तयार होऊं शकतो. उत्पादनवाढ करण्यासाठी गिरणीला अधिक विजेच्या शक्तीची आवश्यकता आहे. अधिक वीज पुरविण्यासाठी १ कोटी रुपये खर्च करावे लागतील.

---

## पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकांतील ठेवी

| मार्चअखेर | | ठेवीदारांची संख्या (हजार) | वर्षअखेर ठेवी ( लक्ष रुपये ) | प्रत्येक ठेवीदाराची सरासरी ठेव ( रुपये ) |
|---|---|---|---|---|
| १९०० | ... | ७८६ | ९,६५ | १२२·८ |
| १९०५ | ... | १,०५९ | १३,४१ | १२६·६ |
| १९१० | ... | १,३७९ | १५,८७ | ११५·१ |
| १९१५ | ... | १,६४४ | १४,८९ | ९०·६ |
| १९२० | ... | १,७६० | २१,३५ | १२१·३ |
| १९२५ | ... | २,१६४ | २५,६४ | ११८·५ |
| १९३० | ... | २,३०५ | ३७,१३ | १६१·१ |
| १९३५ | ... | ३,१०० | ५८,३० | १८८·१ |
| १९४० | ... | ४,५८३ | ७८,३२ | १७०·९ |
| १९४५ | ... | ३,०९५ | ८०,२२ | २५९·२ |
| १९४६ | ... | ३,५०७ | ११५,०५ | ३२८·१ |
| १९४७ | ... | ३,९७३ | १४२,३५ | ३५८·४ |
| १९४८ | ... | ३,१५३ | १२८,११ | ४०६·३ |
| १९४९ | ... | ३,४२६ | १४८,४९ | ४३३·३ |
| १९५० | ... | ३,८०८ | १६७,१९ | ४३९·१ |
| १९५१ | ... | ३,०९० | १८५,०६ | ४५२·५ |
| १९५२ | ... | ४,४४६ | १९९,८१ | ४४९·४ |
| १९५३ | ... | ४,८३० | २१७,६८ | ४५०·७ |
| १९५४ | ... | ५,०७० | २३१,९५ | ४५७·५ |
| १९५५ | ... | ५,३८४ | २५६,४९ | ४७६·४ |
| १९५६ | ... | ५,९८८ | २९३,५० | ४९०·१ |
| १९५७ | ... | ६,३८५ | ३२२,०८ | ५०४·४ |

## कलकत्ता शहरांतील पाणीपुरवठ्याचा प्रश्न

दिल्लीला पाण्याचा पुरवठा करणारा यमुनेचा कालवा नदीचें पात्र बदलल्यामुळें निकामी ठरला आणि राजधानीच्या ह्या शहरीं पाण्याचा ठणठणाट गेल्या महिन्यांत ओळीनें तीन दिवस जाणवला. मोठ्या शहरांना पाण्याचा पुरवठा करण्यासाठी अवाढव्य योजना अंमलांत आणाव्या लागतात. पण शहरांतून होणारी लोकवस्तीची गर्दी योजनांना अपुऱ्या ठरवते. कलकत्ता शहराच्या पाणीपुरवठ्याची व्यवस्थाहि ह्याला अपवाद नाहीं. कलकत्ता शहराची ही व्यवस्था १८९० सालीं करण्यांत आलेली असून ती मुळांत १० लाख लोकवस्तीला पुरी पडेल, अशी करण्यांत आली होती. पण आज कलकत्त्याची लोकसंख्या ३० लाखांवर गेली आहे. अर्थातच, पाणीपुरवठ्याची चालू व्यवस्था कार्यक्षम ठेवण्यांत आली तरी सुद्धां ती अपुरी पडणार आहे. गंगेच्या पात्रांतून पाणी ज्या तळ्यांत घेण्यांत येते तीं फार जुनी झालेलीं आहेत व त्यांत अतिशय गाळ सांठलेला आहे. त्याशिवाय पाण्याच्या मुख्य नळांतून कित्येक ठिकाणीं पाणी झिरपत आहे. ही सर्व परिस्थिति कलकत्ता कॉर्पोरेशनला माहीत आहे आणि पाणीपुरवठ्याच्या व्यवस्थेंत सुधारणा करण्याची योजनाहि आंखण्यांत आली आहे. तथापि, नवे पंप बसविणें, नवे नळ टाकणें, पाण्याचें भूमिगत सांठे बांधणें, इत्यादि कामें त्वरेनें होण्याची शक्यता बरीच कमी आहे. कारण, पोलादाची चणचण ही फार मोठी अडचण आहे. कॉर्पोरेशनतर्फे पाण्याचे मोठे नळ मिळविण्यासाठी खूप खटपट करण्यांत आली. पण पाहिजे होते त्याच्या एक तृतियांश नळच कसेबसे मिळूं शकले. अशा परिस्थितींत शहरांत साथीच्या रोगाचें भय नेहमींच असतें.

## ब्रिटनमधील वाढत्या उत्पादनाचें रहस्य

ब्रिटनचे भारतामधील डेप्युटी हायकमिशनर मे. जनरल बिशप ह्यांनीं इंडिया इंटरनॅशनल क्लब ह्या कलकत्ता येथील संस्थेंत नुकतेंच एक व्याख्यान दिलें. व्याख्यात्यांनीं आपल्या भाषणांत दिलेल्या माहितीवरून, समाजहितवर्धक राज्य संस्था स्थापन करण्याच्या कामीं ब्रिटिश जनतेनें कसे कष्ट उपसले आहेत तें चांगलें लक्षांत येतें. मे. जनरल बिशप आपल्या भाषणांत म्हणाले कीं, युद्धपूर्व काळामधील ब्रिटनचें उत्पादन लक्षांत घेतां आज ब्रिटनमधील कारखाने ७० टक्के अधिक माल उत्पादन करीत आहेत. त्याचप्रमाणें, ब्रिटनच्या शेतीच्या उत्पादनांतहि ६० टक्के वाढ झालेली आहे. गेल्या दहा वर्षांत ब्रिटनमध्यें ३० लाख नवीं घरे बांधण्यांत आलीं. सरासरीनें दर आठवड्याला शाळेच्या १० नव्या इमारती बांधण्यांत आल्या. समाजहितवर्धक राज्याची स्थापना करण्यासाठीं आपल्यापेक्षा मोठ्या देशांच्या दातृत्वावर अगर सदिच्छेवर ब्रिटन अवलंबून राहिलें नाहीं. आजच्या कठीण व धोक्याच्या जगाला तोंड देण्याची संवय ब्रिटिश लोकांनीं लावून घेतली आहे. युरोपमधील एखादें प्रबळ राष्ट्र अगर त्याचा गट ह्यांना तोंड देण्याचा प्रसंग ब्रिटनवर नेहमींच आलेला आहे. पण लोकांनीं अतुल स्वार्थत्याग केला आणि आपलें स्वातंत्र्य टिकविलें. युरोपमधील बदलत्या राजकीय शक्ती नेहमींच ब्रिटनशीं मैत्री दाखवणाऱ्या नव्हत्या. भारत स्वतंत्र झाल्यावरहि ब्रिटननें भारताला साह्य करण्याचें धोरण चालूं ठेवलें आहे. स्वातंत्र्योत्तर काळांत ब्रिटननें भारतांत इतर कोणत्याहि देशापेक्षा १०पट अधिक भांडवल गुंतविलेलें आहे. ह्यावरून भारताबद्दलची ब्रिटनची सदिच्छा सहज दिसून येते.

## अग्निबाणांतून पुन्हां पृथ्वीवर परत

अग्निबाणाच्या साह्यानें अंतरिक्षांतून प्रवास करून दुसऱ्या ग्रहावर जाण्याचीं स्वप्नें जगांतील शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ पहात आहेत. हा धोक्याचा प्रवास माणसाला कितपत झेपेल, हा अवघड प्रश्न सोडविण्यासाठी अग्निबाणांतून प्रथम कुत्र्यासारखे प्राणी अधिकाधिक उंचीवर पाठविण्यांत येत आहेत. रशियानें आपल्या दुसऱ्या उपग्रहांत 'लायका' ह्या कुत्रीला अंतरिक्षांतील प्रवासाला धाडले होते. त्यावेळीं तिला परत पृथ्वीवर आणण्यांत येईल किंवा नाहीं ह्याविषयीं बरीच चर्चा जगभर झाली होती. दुर्दैवानें 'लायका' अंतरिक्षांतच खपली. पण त्यानंतर रशियन शास्त्रज्ञांनी ह्या बाबतींत बरीच प्रगति केलेली दिसते. रशियन शास्त्रज्ञांनीं अग्निबाणाच्या साह्यानें एका कुत्र्याला २७९ मैल उंचीवर अंतराळांत भिरकावले व नंतर त्याला जिवंत स्थितींत परत पृथ्वीवर आणले. ह्या अग्निबाणाचे दोन भाग करण्यांत आलेले असतात. एका भागांत अंतराळांत क्षेपण करणारी यंत्रसामुग्री असते आणि दुसऱ्या भागांत कुत्रा व त्याच्यावरील जीवशास्त्रीय परिणामांची नोंद करणारीं यंत्रें असतात. अग्निबाण इष्ट अशा उंचीवर पोंचल्यावर कुत्रा असलेली पेटी अलग करण्याची स्वयंचलित व्यवस्था केलेली असते. मग अर्थातच ही पेटी झपाट्यानें पृथ्वीकडे येऊं लागते. पेटी जमिनीवर एकदम आपटल्यास कुत्रें कामास येणार व माहिती देणारी नोंद यंत्रेंहि मोडणार. म्हणून पृथ्वीच्या पृष्ठभागापासून दोन-तीन मैलांवर पेटी आल्यावर दोन छत्र्या आपोआप उघडतात. त्यामुळें खालीं येण्याची गति मंदावते. त्यानंतर आणखी एक मोठी छत्री आपोआप उघडते व पेटींतील प्राणी जमिनीवर अलगदपणें आदळतो.

## औद्योगिक शक्तीच्या भारताच्या गरजा

जिनीव्हा येथें संयुक्त-राष्ट्र-संघटनेतर्फे अणुशक्तीचे शांततामय उपयोग दिग्दर्शित करणारी दुसरी आंतरराष्ट्रीय परिषद भरली आहे. ह्या परिषदेंत भारताच्या अणुशक्ती-मंडळाचे अध्यक्ष डॉ. भाभा भाग घेत आहेत. भारताच्या औद्योगिक शक्तीच्या गरजा आणि त्या भागविण्यासाठी अणुशक्तीचा होऊं शकणारा उपयोग ह्यासंबंधीं त्यांनीं एक तांत्रिक अहवाल परिषदेला सादर केला. ह्या अभ्यासपूर्ण अहवालांत असें म्हटलें आहे कीं चालू शतकाच्या अखेरीस भारताची लोकसंख्या ६० कोटींच्या घरांत जाईल. त्या सुमारास भारताच्या औद्योगिक शक्तीचीं साधनें फारच कमी पडतील. आज जे देश औद्योगिक दृष्ट्या पुढारलेले आहेत त्यांच्या इतकीं सुद्धां साधनें २,००० सालच्या सुमारास भारताजवळ असणार नाहींत. दरम्यानच्या काळांत विजेची निर्मिति व कोळशाचें उत्पादन अपेक्षेप्रमाणें वाढेल असें गृहीत धरून हा अंदाज केलेला आहे. औद्योगिक शक्तीचें तिसरें साधन म्हणजे खनिज तेल. पण भारतांत खनिज तेलाचे खात्रीलायक सांठे अगदींच बेताचे आहेत आणि नवीन सांठे मोठ्या प्रमाणांत उपलब्ध होण्याची फारशी शक्यता नाहीं. त्यामुळें विसाव्या शतकाच्या अखेरीचें वरील चित्र फारसें बदलणार नाहीं. भारताजवळ थोरिअम वाळूचे सांठे मात्र मुबलक आहेत. ह्या वाळूपासून युरेनिअमचें जळण तयार करतां येणें शक्य आहे. अर्थशास्त्रीय दृष्टीनें विचार करतां अणुशक्तीच्या साह्यानें उत्पन्न करण्यांत येणारी वीज कोळशाचे साह्यानें प्राप्त होणाऱ्या औद्योगिक शक्तीशीं स्पर्धा करूं शकेल. म्हणूनच देशाच्या भविष्यकालीन गरजा लक्षांत घेतांना अणुशक्तीपासून मिळणाऱ्या औद्योगिक शक्तीचा विचार करण्यांत आला आहे.

## सोविएत ट्रेड युनियन्स

### प्राप्तीचा मार्ग व खर्चाच्या बाबी

सोविएत ट्रेड युनियन्सपाशीं किती निधि असतो आणि तो खर्च कसा केला जातो ?

ट्रेड युनियन्सचा प्राप्तीचा प्रमुख मार्ग म्हणजे प्रवेश–फी. ती बहुधा वेतनाच्या एक टक्क्याइतकी असते आणि सभासदत्वाची मासिक वर्गणी ही प्राप्तीच्या अर्ध्या टक्क्यापासून एक टक्क्यापर्यंत असते.

यासेरीज, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडाविषयक शाखांतून होणारें उत्पन्न आणि ट्रेड युनियन्सच्या मालकीच्या इमारती वगैरेंचें उत्पन्नहि असतें.

ट्रेड युनियनच्या अंदाजपत्रकांत खर्चाचा मोठा भाग सांस्कृतिक कार्यासाठी व कामगार–सदस्यांना भौतिक मदत देण्यासाठी वापरला जातो. ट्रेड युनियनच्या प्राप्तीपैकी फारच थोडा भाग ट्रेड युनियनचा कारभार चालविण्याकडे खर्च केला जातो. गेल्या दहा वर्षांत ( १९४५ ते १९५६ ) सांस्कृतिक व कल्याण-कार्यासाठी होणारा खर्च एकूण प्राप्तीच्या ६८ टक्क्यांपासून ८२ टक्क्यांपर्यंत वाढला आहे; तर ट्रेड युनियनच्या कारभारावर होणारा खर्च व इतर आर्थिक आणि संघटनात्मक कार्यावर होणारा खर्च निम्म्यानें कमी झाला आहे. पांचव्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ट्रेड युनियन्सनीं आपल्या सदस्यांना राजकीय शिक्षण देण्यासाठी व त्यांच्या सांस्कृतिक गरजा भागविण्यासाठी १२०० कोटि रूबल्स खर्च केले. त्याच काळांत शारीरिक शिक्षण व क्रीडा यांच्यासाठी ट्रेड युनियनच्या अंदाजपत्रकांत २३५ कोटि रूबल्सहून अधिक रक्कम खर्चीं पडली आणि २३० कोटि रूबल्सहून अधिक रक्कम सदस्यांना भौतिक मदत देण्याकडे खर्च करण्यांत आली.

जसजशी सभासदसंख्या संथपणें वाढत जाते, तसतसा ट्रेड युनियन्सपाशीं असलेला निधीहि वाढत जातो. १९५१ सालीं ट्रेड युनियन्सपाशीं जेवढा निधि होता त्याहून १५० कोटि रूबल्सनीं अधिक निधि १९५६ सालीं त्यांच्यापाशीं होता.

उदाहरणार्थ, माग्नितोगोर्स्क लोखंड व पोलाद कारखान्यांतील ट्रेड युनियन समितीचें अंदाजपत्रक १९५५ पेक्षा १९५६ सालीं ४० लक्ष रूबल्सनीं वाढून तें ६ कोटि ७० लक्ष रूबल्सचें झालें.

हा पैसा कसा खर्च करण्यांत आला ? प्रथमतः ४ कोटि, ३० लक्ष रूबल्स सरकारी सामाजिक विमा योजनेनुसार मिळावयाच्या फायद्यांवर खर्च झाले. १९५६ सालीं देशांतील आरोग्यधामांतून व विश्रामधामांतून ह्या कारखान्यांतील पगारदार व वेतनदार कामगार, तंत्रज्ञ आणि इंजिनिअर अशा ८,००० लोकांसाठी जागा मिळविण्याच्या कामीं ४० लक्ष रूबल्स खर्चीं पडले.

बालकजन्मानिमित्त देणग्या म्हणून महिलांना २३ लक्ष, ४३ हजार रूबल्स वांटण्यांत आले. आर्थिक स्वरूपाची मदत म्हणून सदस्यांना ७ लक्ष, ५० हजार रूबल्स देण्यांत आले. सांस्कृतिक कामें हातीं घेण्यासाठी ४० लक्ष, रूबल्स आणि शारीरिक शिक्षण व क्रीडा यांच्याप्रीत्यर्थ ८ लक्ष ३० हजार रूबल्सची तरतूद करण्यांत आली.

ट्रेड युनियन संघटनेतर्फे आपापल्या सभासदांसाठी ‘ परस्पर साहाय्य निधि ’ उभारले जातात. ट्रेड युनियनचा सभासद असलेला कोणीहि माणूस ह्या ‘ परस्पर साहाय्य निधींत ’ सामील होऊं शकतो. तो मासिक सभासदत्वाची वर्गणी म्हणून आपल्या मासिक प्राप्तीच्या अर्ध्या टक्क्याएवढी रक्कम देतो. त्याला या ‘ निधीं ’तून बाहेर पडायचें झाल्यास त्यानें अशा रीतीनें भरलेली रक्कम त्याला परत केली जाते. प्रवेश-फी, मासिक सभासदत्वाची वर्गणी आणि ट्रेड युनियन समितीकडून मिळणारी देणगी, यांचा मिळून ‘ परस्पर साहाय्य निधि ’ बनतो. सभासदांना या फंडांतून उसनवारी करतां येते. हप्त्याहप्त्यानें परतफेड करावयाची असते. कांहीं प्रकरणांत हें कर्ज परत देण्याची आवश्यकता नाहीं, असा निर्णय ‘ परस्पर साहाय्य निधी ’चें कारभार–मंडळ घेऊं शकतें.

ट्रेड युनियन्सच्या मालकीचा सर्व निधि व मालमत्ता यांची व्यवस्था फॅक्टरी, स्थानिक, प्रादेशिक आणि मध्यवर्ती ट्रेड युनियन समित्या आणि ऑल युनियन सेंट्रल कौन्सिल ऑफ ट्रेड युनियन्स ह्या संस्था पाहतात. आपापले आर्थिक व्यवहार ह्या समित्या जाहीर करतात. पैसा कसा खर्च केला जातो याचा हिशोब त्यांना सभांपुढें व परिषदांपुढें ठेवावाच लागतो.

सरकारी सामाजिक विमा निधीसारख्या ट्रेड युनियन निधींवर तपासणी समित्यांचें नियंत्रण असतें. ट्रेड युनियनच्या निवडणुका होतात त्याचवेळीं गुप्त मतदान पद्धतीनुसार ह्या ‘ तपासणी समित्या ’ निवडल्या जातात. ट्रेड युनियन समित्यांना आणि सभासदांना त्या एकाच वेळीं आपले अहवाल सादर करतात.

---

## अमेरिकेंतील बँकिंग पद्धतीचा अभ्यास

### १६ हिंदी बँकर्स अमेरिकेकडे रवाना

यु. स्टे. टेक्निकल को-ऑपरेशन मिशननें योजलेल्या हिंदी बँकर्सच्या अमेरिकेंतील दौऱ्यामुळें, १० प्रमुख हिंदी बँकांतील १६ हिंदी बँकर्सना अमेरिकेमधील प्रमुख बँकांची कार्यपद्धति पहावयास मिळेल, मध्यम आकाराच्या कर्जविषयक धोरणांची माहिती मिळेल आणि अमेरिकन बँका एकमेकांना गिऱ्हाइकांच्या पतीसंबंधीं तपशील कसा पुरवितात, तें त्यांच्या दृष्टीस येईल. ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यांत हे १६ बँकर्स अमेरिकेकडे रवाना झाले. त्यांत खालील जणांचा समावेश आहे:—

टी. के. आर. सुब्रह्मण्यम्, के. एन. आर. रामानुजम् आणि बी. एन. मेहता ( रिझर्व्ह बँक ), राम राखा, एस. व्ही. चंदाबरकर, आर. व्ही. पंडित व डी. शांडिल्य ( स्टेट बँक ऑफ इंडिया ), व्ही. सी. पटेल ( सेंट्रल बँक ), आर. पी. चोप्रा ( पंजाब नॅशनल बँक ), के. एस. चतुर्वेदी ( बँक ऑफ इंडिया ), एम. जी. पारिख ( बँक ऑफ बरोडा ), एस. के. पंड्या ( युनायटेड क. बँक ), ए. सी. संथाप्पन ( इंडियन बँक लि. ), पी. के. सेन ( युनायटेड बँक ऑफ इंडिया ), पी. व्ही. गांधी ( देवकरण नानजी बँकिंग कं. ), सी. एस. वेंकटराव ( स्टेट बँक ऑफ हैद्राबाद ). ह्या १६ पैकी १३ बँकर्स अमेरिकेंत तीन महिने राहतील. रिझर्व्ह बँकेचे तिघे अधिकारी सात आठवडे राहतील.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटच्या शेअर-ट्रान्स्फरबाबत निकाल

### डायरेक्टरांचा नकार देण्याचा निर्वेध अधिकार

'दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.' या कंपनीच्या बऱ्याच भागीदारांनीं आपले शेअर्स कांहीं धनिकांना त्यांच्या एजंटामार्फत विकले. कंपनीच्या नियमांप्रमाणें असे शेअर्स दुसऱ्याच्या नांवावर ट्रॅन्स्फर करण्यास नकार देण्याचा निर्वेध अधिकार कंपनीच्या संचालक मंडळास आहे, त्यास अनुसरून कंपनीच्या संचालक-मंडळानें सदर धनिकांच्या नांवावर शेअर्स ट्रॅन्स्फर करण्यास नकार दिला. त्याविरुद्ध, नवीन कंपनी कायद्याचें कलम १११ अन्वयें, वरील धनिकांनीं कंपनी लॉ ॲडमिनिस्ट्रेशन खात्याकडे दोन अपिलें दाखल केलीं होतीं. त्या अपिलांचा निकाल नुकताच लागून तीं फेटाळलीं गेलीं व उपरोक्त शेअर्स वरील धनिकांच्या नांवावर ट्रॅन्स्फर करूं नयेत असा आदेश कंपनीस मिळाला.

### युनायटेड वेस्टर्न बँकेची फलटण येथें कचेरी

सातारा येथील यु. वेस्टर्न बँकेची शाखा फलटण येथें रविवार, दिनांक ७-९-५८ रोजीं उघडण्यांत आली. त्यानिमित्त वरील दिवशीं सायंकाळीं ४ ते ६ पर्यंत पानसुपारी समारंभ करण्यांत आला. शाखेचा पत्ता 'रत्नप्रभा बिल्डिंग, फलटण' असा आहे. बँकेचें वसूल भांडवल ६३ लक्ष रु. व खेळतें भांडवल १३ कोटी रुपयांवर आहे. बँकेच्या मुंबई-फोर्ट, मुंबई-गिरगांव, नासिक, पुणें, बार्शी, लोणंद, कोल्हापूर, हलकर्णी व इचलकरंजी येथें शाखा असून दादर (मुंबई) येथें लवकरच शाखा सुरू होणार आहे.

### कामगार कुटुंबांच्या राहणीचा अभ्यास

भारत सरकारनें निवडक ५० केंद्रांतील कारखाने, खाणी आणि मळे यांमधील कामगारांच्या कौटुंबिक राहणीची पाहणी करण्याची मोहीम सुरू केली आहे. निरनिराळ्या केंद्रांसाठी, तसेंच संबंध देशासाठी समान पायावर कामगारांसाठी ग्राहकोपयोगी वस्तूंच्या किंमतीच्या निदर्शकांची एक नवी मालिका तयार करण्याच्या दृष्टीनें माहिती गोळा करावी, तसेंच कामगारांच्या राहणीमानाच्या पातळीचा अभ्यास करावा असा या पाहणीचा हेतु आहे. ही पाहणी करतांना कांहीं कामगार कुटुंबांतील माणसें, त्यांचें उत्पन्न, खप, निरनिराळ्या बाबींवर होणारा खर्च, जन्म व मृत्यु, आजारपण, साक्षरतेचें प्रमाण, कुशलता, तांत्रिक शिक्षण आणि प्रशिक्षण, कामाची परिस्थिति, घरविषयक स्थिति, कामगारविषयक कायद्यांतील महत्त्वाच्या तरतुदींची त्यांना असलेली कल्पना, देणीघेणीं, इत्यादि संबंधींची माहिती गोळा करण्यांत येईल.

या पाहणीच्या प्रत्यक्ष कामास यापूर्वीच आरंभ झालेला आहे. सदर काम एक वर्षभर चालेल असा अंदाज असून तें नॅशनल सॅम्पल सर्व्हे या संघटनेकडे सोंपविलेलें आहे. पाहणीचें काम करण्यासाठी सर्व संबंधितांनीं सहकार्य द्यावें, अशी भारत सरकारनें त्यांस विनंती केली आहे.

**उच्च शिक्षणासाठी प्रयाण**— सांगली येथील वालचंद एंजिनिअरिंग कॉलेजमधील प्राध्यापक श्री. पी. एन्. गोरे ह्यांना पूर्व जर्मनीच्या सरकारनें उच्च अभ्यास करण्यासाठी शिष्यवृत्ति दिली आहे. श्री. गोरे जर्मनींत दोन वर्षें राहतील व त्या मुदतींत संशोधनाचें काम करतील. ते नुकतेंच बर्लिनला रवाना झाले.


# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : २४८३.

## सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यावरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | व्याजाचा दर |
| --- | --- |
| १ वर्ष | २½ टक्के |
| २ वर्षें | २¾ टक्के |
| ३ वर्षें | ३ टक्के |
| ५ वर्षें | ३½ टक्के |
| १० वर्षें | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवीचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ३१-७-५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक

# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई-१.
(स्थापना : १९११)

चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

भरपाई झालेलें भाग भांडवल :
भागीदारांतर्फे रु. ४४ लक्ष
मुंबई सरकारतर्फे रु. ८१ लक्ष
रु. १ कोटी, २५ लक्ष

गंगाजळी व इतर फंड : रु. ५२ लक्ष
एकूण ठेवी : रु. १२ कोटी
खेळतें भांडवल : रु. २४ कोटींचे वर

१० जिल्ह्यांमध्यें व मुंबई उपनगरांत मिळून ४३ शाखा

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था. सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.

## हिंदी सहकारी बँकांचीं देणीं व येणीं

( आंकडे कोटी रुपयांचे )

| वर्ष | बँकांची संख्या | वसूल भांडवल | रिझर्व्ह व इतर फंड | ठेवी | एकूण देणीं किंवा येणीं | येणें कर्जे | रोख्यांत गुंतवणूक | निव्वळ नफा | कचेऱ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| **अ वर्ग–५ लक्ष रु. पेक्षां अधिक भांडवल–रिझर्व्हच्या बँका** | | | | | | | | | |
| १९४६–४७ | ५१ | ३,०४,७५ | ३,८३,९८ | ४५,५८,६८ | ५५,५२,५४ | २६,७४,८५ | १९,६८,९५ | | २२४ |
| १९४७–४८ | ५६ | ३,३१,३७ | ४,२१,५५ | ४९,४९,५७ | ६०,६४,०६ | २८,००,१९ | २१,५१,४२ | ४४,९९ | २५६ |
| १९४८–४९ | ६३ | ४,०१,३५ | ४,६४,७० | ६२,४८,६५ | ७५,६९,७५ | ४२,१७,९३ | १९,९०,६९ | ५८,६४ | २६७ |
| १९४९–५० | ७२ | ४,७६,९९ | ५,२२,२० | ६४,२३,४५ | ७७,७६,६२ | ४२,४५,०२ | २२,४७,४८ | ५६,७३ | ३०६ |
| १९५०–५१ | ७८ | ५,६१,७० | ५,९०,५२ | ७३,९३,५१ | ९२,१०,०८ | ५३,२४,४० | २३,४७,७१ | ६९,०१ | ३३६ |
| १९५१–५२ | ९० | ६,७३,२७ | ६,६०,५२ | ७९,१९,१५ | १०३,९४,५२ | ६१,४४,७० | २३,९६,७४ | ८०,६६ | ३८८ |
| १९५२–५३ | १०४ | ८,१३,७१ | ८,१८,३४ | ८९,४९,९३ | ११३,२१,९३ | ६६,६०,०५ | २९,३४,७१ | ८५,७२ | ४३३ |
| १९५३–५४ | १२४ | ९,८१,७२ | ८,७३,०४ | १०२,२३,५८ | १२८,५३,५४ | ७५,८५,३७ | ३१,६९,४९ | ८८,१८ | ४९८ |
| १९५४–५५ | १४१ | ११,४८,७४ | ९,६१ ४० | ११५,६२,९६ | १४३,५७,५३ | ८४,२५,६७ | ३४,१९,२२ | १,०४,२५ | ५५२ |
| १९५५–५६ | १४६ | १३,८०,७९ | १०,२४,८२ | १४७,६८,९३ | १८०,६३,५८ | १०५,५२,२१ | ३९,२०,७० | १,१७,७४ | ६९२ |
| १९५६–५७ | १८२ | १८,१२,५८ | ११,९४,४१ | १८५,१३,७४ | २२७,८५,६३ | १४५,८१,९९ | ४३,८६,७७ | १,५०,२१ | ८२४ |
| **ब वर्ग–१ लक्ष ते ५ लक्ष रु. भांडवल–रिझर्व्हच्या बँका** | | | | | | | | | |
| १९४६–४७ | २५८ | २,५०,२३ | २,७५,९३ | २१,२५,४८ | २८,९६,५९ | १३,६९,२८ | ८,०४,२३ | | ३२४ |
| १९४७–४८ | २६७ | २,७२,९६ | २,८०,७२ | २२,५३,८२ | ३०,१२,९९ | १५,४३,४८ | ७,६५,३९ | ३०,२७ | ३४१ |
| १९४८–४९ | २९८ | ३,०७,१५ | ३,०५,७१ | २५,३५,५८ | ३३,५०,२० | १८,९६,६६ | ८,३२,७३ | ३२,२० | ३७७ |
| १९४९–५० | ३१९ | ३,२८,६५ | ३,२८,६७ | २६,२०,०६ | ३४,९१,०१ | १८,८१,११ | ७,७७,१० | ३७,३६ | ४२७ |
| १९५०–५१ | ३३९ | ३,५७,७५ | ३,३८,१४ | २७,०४,५० | ३६,३१,२७ | २०,४०,६९ | ७,२०,८३ | ४३,०५ | ४८७ |
| १९५१–५२ | ३६० | ३,८१,५१ | ३,६८,०५ | २६,६०,९२ | ३६,७२,०८ | २०,७८,६५ | ६,९१,४६ | ४५,३४ | ४८१ |
| १९५२–५३ | ३७३ | ४,१२,५७ | ३,८२,९३ | २५,८६,८३ | ३६,८५,६४ | २०,८८,७७ | ६,८२,०६ | ४२,५० | ४८७ |
| १९५३–५४ | ४१८ | ४,८६,९५ | ३,९४,४० | २७,१५,२४ | ३८,७८,०७ | २२,८५,८० | ७,०१,२४ | ४९,३४ | ५१६ |
| १९५४–५५ | ४४१ | ५,९०,०० | ४,२१,७७ | ३१,०२,५८ | ४२,७५,१३ | २४,८१,६२ | ८,३३,०० | ५३,०७ | ५७८ |
| १९५५–५६ | ४३२ | ६,१२,२४ | ४,४८,६१ | ३६,७०,४४ | ५०,४६,७३ | २९,२२,९२ | १०,१७,४७ | ५६,६७ | ५३७ |
| १९५६–५७ | ४७० | ६,६४,५४ | ४,५१,७८ | ३७,५१,४८ | ५२,०४,५३ | ३१,२९,३२ | ८,९१,७० | ६१,६६ | ५९७ |

**पश्चिम किनाऱ्यावरील बंदरें**—भारताला परदेशीय चलन मिळविणें सुलभ जावें म्हणून पश्चिम किनाऱ्यावरील बंदरांचा विकास घडवून आणावा अशी सूचना म्हैसूरचे माजी मुख्यमंत्री श्री. निजलिंगप्पा ह्यांनीं केली आहे. कारवारजवळील एका छोट्या बंदरांत लोखंड व मँगेनीज ह्यांची माती जहाजावर चढविण्याच्या यांत्रिक व्यवस्थेचें ते उद्‌घाटन करीत होते.

**निर्यातीवर निर्बंध**—उत्तर प्रदेशाच्या सर्व जिल्ह्यांतून तांदूळ व भात ह्यांच्या निर्यातीस बंदी करण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. आतांपर्यंत राज्याच्या पूर्व भागांतील १४ जिल्ह्यांनाच बंदी हुकूम लागूं होता. १९५७ पासून उत्तर प्रदेशांतून गहू बाहेर निर्यात करण्यास बंदी घालण्यांत आलीच होती. आतां बहुतेक अन्नधान्यांना तो लागूं करण्यांत आला आहे.

**हैड्रोजन बाँबच्या शक्तीचा उपयोग**—हैड्रोजन बाँबच्या स्फोटामुळें उत्पन्न होणाऱ्या प्रचंड शक्तीचा औद्योगिक उपयोग करण्याची युक्ति रशिअन शास्त्रज्ञांनीं शोधून काढल्याची वार्ता आहे. ह्या युक्तीचा उपयोग करणाऱ्या 'आग्रा' नांवाच्या यंत्रांची एक छोटी प्रतिकृति जिनिव्हा येथील अणुविषयक प्रदर्शनांत ठेवण्यांत आली आहे. हा शोध रशिअन शास्त्रज्ञांना चार आठवड्यापूर्वी लागला आहे.

**विम्याच्या राष्ट्रीयीकरणाविषयीं मत**—आयुर्विमा व्यवसायाचें राष्ट्रीयीकरण करण्यांत आलें तेव्हांपासून विम्याच्या धंद्याची सुधारणा झाली आहे, असें मत प्रश्नाचें उत्तर देणाऱ्यांपैकी १४ टक्के लोकांनीं व्यक्त केलें आहे. ८ टक्के लोकांच्या मतानें विमाव्यवसाय बिघडला आहे आणि ५ टक्के लोकांच्या मतानें कांहींच फरक झालेला नाहीं.

**उत्तर प्रदेशांतील दारूबंदी**—उत्तर प्रदेशांतील ११ जिल्ह्यांत व तीन पवित्र स्थळांत सध्यां दारूबंदी अमलांत आहे. ह्या भागांतील दारूबंदी पूर्णपणें यशस्वी झाल्यावर इतर जिल्ह्यांतहि दारूबंदी करण्यांत येणार आहे. दारूबंदीच्या धोरणामुळें राज्य सरकारला दरसाल १·४कोटि रुपये उत्पन्नाला मुकावें लागेल.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.